6th sugar asia 2014
www.sugarasia.net
Asia's Leading Exhibition for Sugar & Allied Industries

| Publication | Lokmat | Language | Marathi |
|---|---|---|---|
| News | *6th Sugar Asia 2014, an international Conference and Expo on Sugar* | Date | 22nd Feb., 2014 |
| Edition | Mumbai | Page No. | 07 |

७ लोकमत मुंबई, शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०१४

# सहावी साखर परिषद मुंबईत



**मुंबई :** साखर उद्योग व त्या अनुषंगाने असलेले पूरक उद्योग यामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या घडामोडींचा वेध घेणारी परिषद व प्रदर्शन येत्या २७ व २८ फेब्रुवारी रोजी मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. 'सहावी शुगर एशिया २०१४' या नावाने होत असलेल्या या परिषदेचे आयोजन वांद्रे एक्झिबिशन सेंटर येथे करण्यात आले आहे.

मेसमेज एक्झिबिटर्स प्रा.लि.ने आयोजित केलेल्या या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे, साखर उत्पादनाशी संबंधित असा इथेनॉल, डिस्टिलरीज, जैव ऊर्जा, उसाची शेती यासंदर्भात जागतिक पातळीवर काम करणाऱ्या बहुतांश प्रमुख कंपन्या आपल्या उत्पादनांसह हजर राहणार आहेत. तीन दिवसांच्या या परिषदेच्या निमित्ताने या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधता येईल. या परिषदेच्या निमित्ताने अमेरिका, नेदरलँड्स, इराक, श्रीलंका, जर्मनी यांच्यासह सुमारे २७ देशांतील कंपन्या उपस्थित राहणार असून त्यांच्या येथे सुरू असलेल्या संशोधनांची मांडणी सादर करणार आहेत. (प्रतिनिधी)